सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - ८८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. १३ मे २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

# मुंबई, पुणे, नागपूर, अकोला, नांदेड, नाशिकसह जळगावात एटीएसचे छापे

## पाकिस्तानी गँगस्टर शहजाद भट्टीच्या संपर्कातील तरुण रडारवर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अकोला** – पाकिस्तानी गँगस्टर शहजाद भट्टी याच्याविरोधात महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने मोठी कारवाई सुरू केली असून राज्यातील विविध शहरांमध्ये एकाचवेळी धाडसत्र राबवण्यात आले आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून भारतातील तरुणांना आपल्या जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न करणाऱ्या या गँगस्टरविरोधात एटीएसने आक्रमक भूमिका घेतली आहे. सकाळपासून सुरू झालेल्या या कारवाईमुळे राज्यातील सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या असून अनेक ठिकाणी चौकशी आणि तपास सुरू आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई, पुणे, नालासोपारा, मिरारोड, नागपूर, अकोला, नांदेड, नाशिक आणि जळगाव या शहरांमध्ये एटीएसने छापे टाकले आहेत. सोशल मीडियावरून शहजाद भट्टी किंवा त्याच्या डोगर गँगशी संपर्कात असलेल्या व्यक्तींची माहिती गोळा केली जात आहे. या कारवाईत काही संशयितांच्या डिजिटल व्यवहारांची आणि सोशल मीडिया अकाउंट्सची तपासणी सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. महाराष्ट्रातील गँगस्टर नेटवर्क मोडीत काढण्यासाठी ही मोठी मोहीम असल्याचं सांगितलं जात आहे.



तपास यंत्रणांच्या माहितीनुसार, शहजाद भट्टी हा पाकिस्तानातील लाहोरचा रहिवासी असून सध्या दुबईतून आपले नेटवर्क चालवत आहे. सोशल मीडियावर लोकप्रियता मिळवण्याच्या प्रयत्नात असलेल्या काही भारतीय तरुणांना तो सहजपणे आपल्या संपर्कात आणत असल्याचं उघड झालं आहे. कट्टरतावाद, हेरगिरी आणि गुन्हेगारी कारवायांकडे तरुणांना वळवण्याचा प्रयत्न त्याच्या माध्यमातून होत असल्याचा संशय सुरक्षा यंत्रणांनी व्यक्त केला आहे.

गेल्या काही महिन्यांत भारतातील काही दहशतवादी भरती आणि हेरगिरीशी संबंधित प्रकरणांमध्ये शहजाद भट्टीचे नाव समोर आले होते. त्यानंतर केंद्रीय आणि राज्य सुरक्षा यंत्रणांनी त्याच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यास सुरुवात केली होती. सोशल मीडियाद्वारे तो भारतीय तरुणांशी संपर्क वाढवत असल्याची माहिती मिळाल्यानंतर महाराष्ट्र एटीएसने स्वतंत्र तपास सुरू केला. त्यातूनच आता राज्यभरात ही मोठी धडक कारवाई करण्यात येत आहे.एटीएसच्या तपासात काही तरुण भट्टीच्या नेटवर्कच्या संपर्कात असल्याचे प्राथमिक संकेत मिळाले आहेत. संबंधित तरुणांनी कोणत्या माध्यमातून संपर्क साधला, त्यांना कोणत्या प्रकारचे संदेश पाठवले गेले आणि त्यामागचा उद्देश काय होता, याचा तपास सुरू आहे. काही संशयितांकडून मोबाईल फोन, लॅपटॉप आणि इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांचीही तपासणी करण्यात येत असल्याचं समोर आलं आहे.

### राज्यभरात एकाचवेळी कारवाई

दरम्यान, शहजाद भट्टी भारतात आपले जाळे वाढवण्याचा प्रयत्न करत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. सोशल मीडियाचा वापर करून तरुणांना प्रभावित करण्याचा त्याचा प्रयत्न सुरक्षा यंत्रणांसाठी चिंतेचा विषय बनला आहे. त्यामुळेच महाराष्ट्र एटीएसने कठोर पावले उचलत राज्यभरात एकाचवेळी कारवाई सुरू केली आहे. या प्रकरणात पुढील काही दिवसांत आणखी मोठे खुलासे होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.–

## पूल पाहणीदरम्यान मधमाशांचा हल्ला

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सुखरुप, काही पोलिस कर्मचारी, आणि पत्रकारांना मधमाशांच्या दंशामुळे किरकोळ दुखापत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३ सातारा बामणोली :** सातारा जिल्ह्यातील तापोळा – अहिर – कांदाटी – कोयना विभागाला जोडणाऱ्या नव्या केबल पुलाच्या पाहणीदरम्यान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर आणि त्यांच्या ताफ्यावर मधमाशांनी हल्ला केल्याची घटना रविवार, दि. ११ मे रोजी दुपारी घडली. या घटनेमुळे पुलावर उपस्थित अधिकारी, पोलिस कर्मचारी, कार्यकर्ते आणि पत्रकारांमध्ये काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.



मिळालेल्या माहितीनुसार, एकनाथ शिंदे हे महाबळेश्वर तालुक्यातील दुर्गम कांदाटी खोऱ्यातील उचाट गावात श्री कुंभाळजाई देवी मंदिर प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमासाठी आले होते. कार्यक्रम आटोपल्यानंतर त्यांनी तापोळा – अहिर – कांदाटी – कोयना परिसराला जोडणाऱ्या नव्या 'सीलिंग ब्रिज'ची पाहणी केली. पुलाच्या कामाची माहिती घेत असताना परिसरातील मधमाशांचे पोळे अचानक अस्वस्थ झाले आणि मधमाशांनी उपस्थितांवर हल्ला चढवला.

या अचानक झालेल्या प्रकारामुळे उपस्थितांची एकच धावपळ उडाली.

अनेकांनी स्वतःचा बचाव करण्यासाठी पुलावरून सुरक्षित स्थळी धाव घेतली. काही पोलिस कर्मचारी, कार्यकर्ते आणि पत्रकारांना मधमाशांच्या दंशामुळे किरकोळ दुखापत झाल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे या घटनेतून सुखरूप बचावले. घटनेनंतर प्रशासनाने परिसराची पाहणी करून सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्यास सुरुवात केली. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.

## २२ आमदार घेऊन सुनिल तटकरे आणि प्रफुल पटेल 'भाजपा'मधून लढणार; रोहित पवारांचा मोठा दावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३मुंबई–** राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार सुनिल तटकरे यांनी काल खासदार शरद पवार यांची भेट घेतली. या भेटीनंतर राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाल्या. तटकरे यांनी ही भेट फक्त तब्येतीच्या विचारपूस करण्यासाठी असल्याचे सांगितले. दरम्यान, आता आमदार रोहित पवार यांनी या भेटीबाबत मोठा दावा केला आहे. २२ आमदार घेऊन खासदार सुनिल तटकरे आणि प्रफुल पटेल भाजपामधून लढणार असल्याचा दावा केला आहे. या दाव्यामुळे आता राजकीय वर्तुळात उलट-सुलट चर्चा सुरू आहेत.




तटकरे आणि पटेल राष्ट्रवादी काँग्रेसचे २२ आमदार घेऊन भाजपामधून लढणार आहेत. एकनाथ शिंदे यांच्या पक्षाचेही काही आमदार गळाला लागले आहेत, असा दावा आमदार रोहित पवार यांनी आज पत्रकार परिषदेत बोलताना केला. मावळचे आमदार भाजपामधून लढणार आहेत असेही पवार म्हणाले. सुनिल तटकरे यांना सिल्वर ओकवरील चहा आवडत असेल, असा टोलाही रोहित पवार यांनी तटकरे यांना लगावला.

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि खासदार सुनील तटकरे यांनी काल 'सिल्व्हर ओक' या निवासस्थानी जाऊन शरद पवार यांची सदिच्छा भेट घेतली. गेल्या काही दिवसांपासून शरद पवार यांची प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना ब्रीचकँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारानंतर पवारांची प्रकृती आता उत्तम असून, तटकरे यांनी त्यांची भेट घेऊन प्रकृतीची विचारपूस केली.

सुनील तटकरे यांनी आपल्या ट्विटमध्ये स्पष्ट केले आहे की, ही भेट केवळ सदिच्छा भेट होती. पवार साहेब रुग्णालयातून घरी परतल्यापासून त्यांची भेट घेण्याचे नियोजन होते, मात्र वेळेअभावी ते शक्य झाले नव्हते. अखेर काल ही भेट पार पडली. तटकरे यांनी आवर्जून नमूद केले की, या भेटीत कोणत्याही राजकीय विषयांवर चर्चा झाली नाही.

सुनील तटकरे यांनी शरद पवारांच्या मार्गदर्शनाखाली प्रदीर्घ काळ काम केले आहे. त्यांच्या राजकीय जडणघडणीत पवारांचा मोठा वाटा असल्याचे त्यांनी मान्य केले. महाराष्ट्राच्या राजकारणात मतभेद असले तरी मनभेद न ठेवण्याची एक समृद्ध परंपरा आहे, आणि याच परंपरेला अनुसरून ही भेट घेतली, असे तटकरे यांनी म्हटले आहे.

## पेट्रोल-डिझेलचे दर वाढण्याची शक्यता, RBI गव्हर्नरनीसुद्धा व्यक्त केली भीती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३मुंबई–**
देशवासियांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन आवश्यकतेनुसार वापरण्याचा आणि बचतीचा सल्ला दिला आहे. यानंतर देशात पेट्रोल डिझेलच्या किंमती वाढण्याचे पेट्रोलियम मंत्र्यांनी दिले होते. दरम्यान, येत्या काही दिवसात पेट्रोल डिझेलचे दर वाढण्याची शक्यता आहे. अर्थात सरकारकडून हे दावे फेटाळले जात आहेत. मात्र भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी म्हटलं की, जर पश्चिम आशियातील युद्ध आणखी काही काळ सुरू राहिलं तर भारतात इंधनाच्या किंमतीत वाढ करावी लागू शकते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी



परकीय चलन वाचवण्यासाठी खर्चात कपात करण्याचं आवाहन केलंय. यात पेट्रोल डिझेलचा वापर कमी करणं, सोने खरेदी टाळणं यांचा समावेश आहे. सरकारने सोन्यावर आयात शुल्कात दुप्पट वाढ केलीय. आयात कमी करण्याच्या उद्देशाने आणखी पावलं उचलली जाण्याची शक्यता आहे.

संजय मल्होत्रा एका कार्यक्रमात बोलताना म्हणाले की, जर अशीच परिस्थिती आणखी काही काळ राहिली तर सरकार किंमतीत झालेल्या वाढीचं ओझं ग्राहकांवर टाकेल. सरकारी इंधन विक्रेते कच्च्या तेलाच्या किंमतीत झालेली वाढ सहन करत आहेत. भारतात एप्रिल महिन्यात किरकोळ महागाई वाढून ३.४८ टक्के झालीय.

रिझर्व्ह बँकेनं सध्याच्या आर्थिक वर्षात ६.९ टक्के वाढीचा अंदाज व्यक्त केलाय. यात महागाई सरासरी ४.६ टक्के राहील अशी अपेक्षा आहे. मात्र अर्थतज्ज्ञांच्या मते युद्धामुळे वाढ आणखी कमी होईल. तसंच महागाईत वाढ होण्याची शक्यता आहे.

## परदेश दौरे रद्द करा, ताफ्यातील गाड्या कमी करा

### पीएम मोदींच्या आवाहनानंतर मुख्यमंत्री फडणवीसांचे मंत्री आणि अधिकाऱ्यांना आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३मुंबई–** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील वाढत्या इंधन टंचाईच्या आणि जागतिक आर्थिक संकटाच्या पार्श्वभूमीवर केलेल्या काटकसरीच्या आवाहनाला प्रतिसाद देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. राज्यातील मंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांचे आगामी सर्व परदेश दौरे तातडीने रद्द करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. विशेष म्हणजे, ज्या दौऱ्यांची पूर्वतयारी झाली आहे किंवा ज्यांना मंजुरी मिळाली आहे, असे दौरेही आता रद्द करावे लागणार आहेत.

विविध सरकारी कामांसाठी किंवा अभ्यासाच्या नावाखाली परदेशात जाणाऱ्या मंत्री आणि अधिकाऱ्यांच्या संख्येवर यामुळे मोठा परिणाम होणार आहे. परकीय चलन वाचवण्यासाठी आणि प्रशासकीय खर्च कमी करण्यासाठी पंतप्रधान मोदींच्या आवाहनाला प्रतिसाद देत मुख्यमंत्र्यांनी हा मोठा निर्णय घेतला आहे. यापुढे कोणत्याही तातडीच्या कामाशिवाय परदेश प्रवासाला परवानगी दिली जाणार नाही, असे संकेत देण्यात आले आहेत.



### मंत्र्यांच्या ताफ्यातील गाड्यांची संख्या घटणार

केवळ परदेश दौरेच नाही, तर राज्यातील मंत्र्यांच्या लवाजम्यावरही आता मर्यादा येणार आहे. अनेक मंत्र्यांच्या ताफ्यात गाड्यांची मोठी रांग असते, ज्यामुळे इंधनाचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय होतो. ही बाब लक्षात घेऊन सामान्य प्रशासन विभागाने आता मंत्र्यांच्या ताफ्याचा आढावा घेण्याची मोहीम हाती घेतली आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी तसे आदेश दिल्याची माहिती समोर आली आहे. ज्या मंत्र्यांच्या ताफ्यात गरजेपेक्षा जास्त वाहने आहेत, ती तातडीने कमी केली जाणार आहेत. विशेषतः मतदारसंघाच्या दौऱ्यावर असताना लागणाऱ्या वाहनांच्या लांबच लांब रांगा आता कमी दिसणार आहेत.




## अमरावती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या जागेचा प्रश्न मार्गी;आ. राणा यांच्या पाठपुराव्याला यश

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१३ मुंबई –**
अमरावती येथे प्रस्तावित शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या जागेचा प्रश्न अखेर मार्गी लागण्याच्या दिशेने महत्त्वाची पावले उचलण्यात आली आहेत. मौजा अलीयाबाद गट क्रमांक ९/१ येथील महाविद्यालयासाठी मंजूर जमीन वनविभागाच्या अखत्यारीत असल्याने प्रकल्पासमोर मोठा प्रशासकीय अडथळा निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर आमदार रवी राणा यांनी राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांची तातडीची बैठक घेऊन सविस्तर चर्चा केली.बैठकीदरम्यान आ. रवि राणा यांनी अमरावती व बडनेरा परिसरासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय किती महत्त्वाचे आहे, याची माहिती देत प्रकल्प रखडू नये यासाठी



तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली. संबंधित जमीन वनविभागाच्या अखत्यारीत असल्यामुळे बांधकाम प्रक्रियेत अडचणी निर्माण होत होत्या. यावर तोडगा म्हणून मंजूर जमीन त्याच ठिकाणी कायम ठेवून वनविभागाला म्युच्युअल अंडरस्टँडिंग अंतर्गत पर्यायी जागा उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला.आ. रवि राणा यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळत वनमंत्री गणेश नाईक यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाहीचे आदेश दिल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या उभारणीचा मार्ग मोकळा होण्याची शक्यता निर्माण झाली असून अमरावतीकरांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.या महाविद्यालयामुळे विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणासाठी मोठी संधी उपलब्ध होणार असून जिल्ह्यातील आरोग्य सुविधा अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे. बैठकीला वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैस्कर, सचिव जयश्री भोज, मुख्य वनसंरक्षक एन. आर. प्रवीण, उपवनसंरक्षक जितेंद्र रामगावकर यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## संपादकीय ......

# भारतविरोधी छुप्या युद्धाचा धर्मांतरापर्यंत विस्तार!

*भारताच्या फाळणीनंतर मुस्लिमांना पाकिस्तान नावाचा एक वेगळा देश मिळाला. त्यामुळे ते आपला विकास करून घेतील आणि तिथे शांततेने नांदतील असे वाटत होते, पण तसे न होता यांनी भारतद्वेषावर आपली वाटचाल चालू ठेवली. जे मुसलमान पाकिस्तानात गेले नाहीत, त्यांच्यापैकी काहींचा पाकिस्तानातील मुस्लीम दहशतवाद्यांना घातपातासाठी उपयोग होत असतो. आपण भारताशी थेट लढू शकत नाही, हे लक्षात आल्यावर पाकिस्तानने छुपे युद्ध सुरू केले. त्याचा विस्तार आता भारतात धर्मांतरापर्यंत येऊन पोहोचला आहे.*

*भारत, पाकिस्तान आणि बांगलादेश या देशांमध्ये राहणारे मुसलमान भारताची फाळणी होऊन ७९ वर्षे झाल्यानंतर आता वेगळ्या आव्हानांना सामोरे जात आहेत. पाकिस्तानचे निर्माते महमद अली जिना आणि मुस्लीम लीग यांचा असा दावा होता की, हिंदू आणि मुस्लीम यांचा भारतीय उपखंडात ६०० वर्षे संघर्ष सुरू राहिलेला आहे. ते दोन वेगळे धर्म आहेत, त्यांच्या धार्मिक श्रद्धा, खानपान, पोषाख, राहणीमानाच्या पद्धती वेगळ्या आहेत. त्यामुळे या दोन धर्माचे लोक एकत्र राहू शकणार नाहीत. त्यामुळे त्यांच्यासाठी दोन वेगळ्या देशांची गरज आहे. त्यातूनच मग धार्मिक आधारावर मुसलमानांसाठी पाकिस्तान आणि हिंदूंसाठी हिंदुस्तान या द्विराष्ट्र सिद्धांतावर भारताची फाळणी झाली, पण धार्मिक आधारावर लोकसंख्येचे पूर्णपणे स्थानांतर झाले नाही. मुसलमानांसाठी वेगळ्या पाकिस्तानाची निर्मिती झाली असली तरी बहुसंख्य मुसलमान भारतातच राहिले.*

*भारताची फाळणी होऊन आता ७९ वर्षे झालेली असली तरी आजची स्थिती पाहिल्यावर ती पूर्णत्वास गेली असे वाटत नाही. पुढील काळात ती पूर्ण होईल, असेही वाटत नाही. कारण आम्ही हिंदूपेक्षा वेगळे आहोत, असा कितीही दावा पाकिस्तानी मुसलमान करत असले तरी त्यांना भारताचा विरोध केल्याशिवाय जगता येत नाही. भारतविरोध हिच त्यांची भूमिका होऊन बसली आहे. खरे तर वेगळा देश मिळाल्यावर त्यांनी देश उभारणीसाठी विकासात्मक कार्यक्रम हाती घ्यायला हवे होते. एक प्रबळ राष्ट्र म्हणून उभे राहायला हवे होते. त्यांना जे शत्रू वाटत होते, त्या हिंदूंना त्यांनी पाकिस्तानातून नेस्तनाबूत करून टाकले होते. त्यामुळे त्यांच्या विकासकार्यात कुठलाच अडथळा नव्हता. तरी पण आज पाकिस्तानची अशी हिनदीन अवस्था का झाली. त्यांना आज कुणी कर्ज द्यायलाही तयार नाही, त्यांना कटोरा घेऊन जगात फिरावे लागत आहे, अशी कबुली त्यांच्याच नेत्यांनी दिली आहे.*

*जिना यांनी केलेली भारताची फाळणी अजूनही पूर्ण झालेली नाही. कारण जे मुसलमान असे म्हणत आहेत की, आम्ही स्वतःच्या मर्जीने भारतात राहिलो. पण आज ७९ वर्षे झाल्यावरही भारत, पाकिस्तान आणि १९७१ साली निर्माण झालेल्या बांगलादेश या तिन्ही देशातील मुसलमानांना जी जवळीकता वाटते ती काही कमी झालेली नाही. त्यामुळे ते जरी तीन वेगळ्या देशांमध्ये राहत असले तरी मनाने त्यांचा भाईचारा कायम आहे. त्यामुळे मनाने ते अजूनही एकाच देशात राहत आहेत. म्हणजे ते तीन वेगळ्या देशात असले तरी मानसिकदृष्ट्या त्यांचे एक राष्ट्र आहे. कारण मुळात ते अखंड भारत नावाच्या एका देशात होते. फाळणीमुळे जमिनीची विभागणी तीन देशांमध्ये झाली असली तरी मनांची विभागणी झालेली नाही. तशी होण्यासाठी काही हजार वर्षांचा काळ जावा लागतो. जसे भारतीय म्हणतात, अफगाणिस्तान हा पूर्वी भारताचा भाग होता.*

*दुर्योधनाची आई गांधारी ही कंदाहरमधली. गांधार प्रदेश हे शकुनीचे राज्य. पण आज त्या भागातील लोकांचे आणि भारतीयांचे साम्य राहिलेले नाही. पण भारत, पाकिस्तान, बांगलादेश या विभाजनाला असा काही हजारो वर्षांचा कालावधी लोटलेला नाही. त्यामुळे दूरस्थता आणि वेगळेपणा निर्माण झालेली नाही. परिणामी जे पाकिस्तानी अतिरेकी घातपात घडविण्यासाठी भारतात येतात त्यांना सहाय्य करण्याचे काम इथेल काही मुस्लीम करत असतात. पाकिस्तानी सूत्रधारांचे हस्तक म्हणून काम करतात. त्यांना पाकिस्तानातील माणूस परका वाटत नाही. त्यामुळे ते भारत सरकार आणि इथल्या महत्त्वाच्या आस्थापनांविरोधात घातपात करायला त्याला मदत करतात. हा माणूस परक्या देशातून आलेला आहे, त्याला आपण आपल्या देशाच्या विरोधात कशी काय मदत करत आहोत, याची त्यांना अजिबात खंत वाटत नाही. १९९३ साली मुंबईत जे १२ बॉम्बस्फोट झाले, त्यावेळी स्फोटके भरलेल्या गाड्या १२ ठिकाणी पार्क करणारे इथलेच काही मुसलमान होते. त्यांनी पाकिस्तानातील सूत्रधारांच्या इशार्यावरून हे घातपाती काम केले होते. त्यानंतर प्रचंड हाहा:कार उडाला होता.*

*भारताची फाळणी होऊन मुसलमानांना हवा तसा वेगळा देश मिळाला, मग त्यांनी त्यांच्या देशाचा विकास करणे अपेक्षित होते. पण त्यांच्या देशातील राजकीय नेते आणि लष्कर भारत द्वेषावर आपल्या पोळ्या भाजत राहिले. भारत हा आपला मोठा शत्रू आहे. त्याच्याविरुद्ध आपल्याला लढायचे आहे, अशीच शिकवण ते लोकांना देत राहिले. अगदी शालेय पातळीवरही मुलांना तेच शिकवत राहिले. खरे तर त्यांनी स्वतंत्र राष्ट्र मिळाल्यानंतर स्वत:च्या प्रगतीच्या दिशेने पावले उचलून स्वत:चा विकास करून घ्यायला हवा होता. भारताने पाकिस्तानला कुठलाही उपद्रव दिलेला नाही, उलट, भारताने दोस्तीचा हात पुढे करून सहकार्य वाढवण्याचा प्रयत्न केला. पण वेळोवेळी पाकिस्तानने कुरापती करून भारताचा विश्वासघात केला. पाकिस्तानला अमेरिका, चीन, तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरून जी मदत मिळाली ती त्यांनी भारतविरोधात वापरली. ती विकासासाठी वापरली नाही. त्यामुळे त्यांचे नुकसान झाले. त्यांनी चांगल्या पायाभूत सुविधा निर्माण केल्या असत्या, चांगल्या शाळा, महाविद्यालये, तंत्रज्ञान विद्यापीठे उभी केली असती तर आज पाकिस्तानात नवे उद्योग आले असते.शिकलेल्या लोकांना रोजगाराच्या संधी मिळाल्या असत्या. पण पाकिस्तानने तसे काही केले नाही. त्याचे परिणाम आज पाकिस्तानला भोगावे लागत आहेत. तिथे कुठलीही बहुराष्ट्रीय कंपनी गुंतवणूक करत नाही. त्यामुळे रोजगाराच्या संधी नाहीत. त्यामुळे अनेक मुले धार्मिक शिक्षणाकडे आणि पर्यायाने भारतविरोधी दहशतवादाकडे वळतात. आज पाकिस्तानची झालेली दुर्दशा पाहून तिथल्या बुद्धिजीवी लोकांना त्या विळख्यातून बाहेर पडावे, असे वाटत आहे. पण तिथली परिस्थिती दिवसेंदिवस बिघडत आहे. त्या देशातील सत्ताधार्यांनी आणि लष्कराने भारताशी चांगले संबंध ठेवले तर परिस्थितीत बदल होऊ शकतो, पण ते तसे करतील, असे वाटत नाही. कारण भारतद्वेषावर पाकिस्तान टिकून आहे, असे त्यांना वाटते. कारण भारताला धडा शिकवण्याच्या आरोळ्या देऊन ते निवडणुका जिंकत असतात.*

# भग्न दगडांपासून अखंड श्रद्धेपर्यंत सोमनाथची गाथा



## विशेष लेख:

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लवकरच, १३ नोव्हेंबर १९४७ रोजी तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री आणि उपपंतप्रधान सरदार वल्लभभाई पटेल सोमनाथ येथे गेले. समुद्रकिनारी उभे राहून त्यांनी मंदिराच्या भग्नावशेषांकडे गंभीर नजरेने पाहिले आणि एक प्रतिज्ञा केली सोमनाथ मंदिराच्या पुनर्निर्माणाची. तो क्षण म्हणजे भारताच्या सांस्कृतिक पुनर्जागरणाचा पहिला मोठा जागर; आपल्या सभ्यतेच्या स्वाभिमानाच्या सार्वजनिक पुनर्प्राप्तीचा क्षण होता.

आणि आता, ११ मे रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सोमनाथ अमृत महोत्सवात उपस्थित राहून मंदिराच्या पुनर्स्थापित तेजात सहभाग घेतला, तेव्हा तीच प्रतिज्ञा पुन्हा नव्याने प्रज्वलित झाल्यासारखी वाटते. विशेष महापूजा, कुंभाभिषेक, ध्वजारोहण आणि लाखो भाविकांची उपस्थिती–हे सर्व मिळून भग्नावस्थेतून पुनर्निर्माणाकडे आणि पुनरुत्थानाकडे झालेल्या अखंड प्रवासाची घोषणा करतात. सरदार पटेलांच्या दूरदृष्टीपासून आजच्या आत्मविश्वासपूर्ण भारतापर्यंतचा हा अखंड सांस्कृतिक प्रवाह आहे. ही परंपरा, कालातीत आणि प्रेरणादायी, प्रत्येक पिढीला आपल्या वारशाचे जतन करण्याचे, ऐक्याचे रक्षण करण्याचे आणि भारताच्या सनातन आत्म्यावर दृढ श्रद्धा ठेवत समृद्ध, सुसंवादी आणि अखंड भविष्याकडे वाटचाल करण्याचे आवाहन करते.

अमेरिकन लेखक मार्क ट्वेन यांनी एकदा म्हटले होते की वाराणसी इतिहास, परंपरा आणि आख्यायिकांपेक्षाही प्राचीन आहे. पण कदाचित त्यांनी प्रभास पाटण आणि सोमनाथ पाहिले नसावे. भागवत पुराणानुसार, चंद्राला त्याचे सासरे दक्ष यांनी शाप दिला होता. त्या शापातून मुक्त होण्यासाठी चंद्राने याच स्थळी भगवान शिवाची आराधना केली आणि म्हणूनच ‘सोमनाथ–चंद्राचा अधिपती’ हे नाव उदयास आले.

मंदिर उभे राहण्याच्या खूप आधीपासून प्रभास पाटण हे मानवी वस्तीचे केंद्र होते. इ.स.पू. ३००० पासून येथे शेती आणि पशुपालन करणारी पूर्व–हडप्पा संस्कृती अस्तित्वात होती. सिंधू संस्कृतीच्या ऱ्हासानंतरही येथे जीवन टिकून राहिले. येथे सापडलेली रेड पॉलिश्ड वेअर मातीची भांडी आणि प्रारंभीच्या लिपींचे पुरावे याची साक्ष देतात. इसवी सनाच्या प्रारंभीच्या शतकांत हे एक साधे पण महत्वाचे नगर होते. समुद्रकिनाऱ्यालगत ७ ते १० मीटर खोलीवर सापडलेले दगडी नांगर प्राचीन सागरी व्यापाराचे साक्षीदार आहेत. हा किनारा केवळ निसर्गरम्य नव्हता, तर व्यापाराचे प्रवेशद्वार होता. येथे वस्ती आणि पवित्रता एकत्र वाढत गेली.

प्राचीन ग्रंथांमध्ये प्रभास क्षेत्राला तीर्थ म्हणून संबोधले आहे. महाभारतामध्ये भगवान कृष्णाच्या देहत्यागाचे स्थळ म्हणून प्रभासाचा उल्लेख आहे. दगडांनी अमरत्वाची भाषा शिकण्यापूर्वीच हा किनारा सांसारिक आणि आध्यात्मिक जगामधील एक पवित्र संगम होता. त्याची प्रारंभीची रूपे साधी–लाकूड आणि गवताची–असली, तरी ती मानवी मनाच्या दैवी शोधाची खूण होती.

इ.स. ६४९ च्या सुमारास वल्लभीच्या मैत्रक राजवटीत पहिले ऐतिहासिकदृष्ट्या प्रमाणित मंदिर उभे राहिले. पुढे ९व्या–१०व्या शतकात चालुक्य/सोलंकी काळात सोमनाथ हे काशी आणि उज्जैनच्या बरोबरीचे प्रमुख तीर्थस्थान बनले. पुरातत्त्ववेत्ता बी. के. थापर यांना १९५०–५१ मधील उत्खननात असलेले गर्भगृह, अंतराळ आणि सभामंडप यांचा समावेश असलेली भव्य रचना. पूर्वाभिमुख त्रि–अंग संधार प्रासादाचे अवशेष सापडले. लक्षुलीश मूर्तीच्या अवशेषांनी त्याची शैव परंपरा सिद्ध केली. विद्वान मंदिराच्या नेमक्या कालखंडावर मतभेद करतात, परंतु एक गोष्ट निर्विवाद आहे–सोमनाथ त्या काळात अत्यंत वैभवशाली झाले होते आणि लवकरच त्याची कठोर परीक्षा होणार होती.

ही परीक्षा अनेक लाटांमध्ये आली. इ.स. ७२५ मध्ये उमय्यद सेनापती जुनैद इब्न अब्द अल–रहमान अल–मुरीने हल्ला केला, जो पहिला इस्लामी आक्रमण मानला जातो. परंतु सर्वात मोठा आघात ८ जानेवारी १०२६ रोजी झाला, जेव्हा गझनीचा महमूद आपल्या पंधराव्या मोहिमेत सोमनाथावर चालून आला. शिवलिंग फोडण्यात आले, खजिना लुटण्यात आला. अल बिरुनी यांनी मंदिरातील संपत्तीचे वर्णन केले आहे. सोने, चांदी, मोती, रत्ने आणि गावांच्या महसुलातून जमा झालेली संपदा.

तथापि, पुरातत्त्वीय पुरावे दर्शवतात की मंदिराचे भग्नावशेष त्वरित एकत्र करून सुरक्षितपणे पुरले गेले. म्हणजेच, श्रद्धा उद्ध्वस्त झाली नव्हती. इ.स. १०३८ मध्ये गोव्याच्या कदंब राजाने सोमनाथाला भेट दिली, यावरून पूजा–अर्चा किंवा पुनरुज्जीवनाची भावना त्वरित पुन्हा उभी राहिल्याचे दिसते. मंदिराचे रूप तुटले, पण संस्कृतीचे चेतन कायम राहिले.पुढील काळातही विध्वंस आणि पुनर्निर्माण यांचे चक्र सुरूच राहिले. इ.स. ११६९ मध्ये सोलंकी राजा कुमारपालाने पाचवे भव्य दगडी मंदिर उभारले. प्रभास पाटण येथील भद्रकाली मंदिरातील शिलालेखात त्याचा उल्लेख आहे.त्यानंतर १२९९ मध्ये अलाउद्दीन खिलजीचा सेनापती उलुघ खानने मंदिर उद्ध्वस्त केले. स्थानिक रक्षक वाजा मालसुत आणि पदमल यांनी मंदिररक्षण करताना प्राण दिले. पुढे चुडासमा राजा महिपाल देव यांनी १३०८ मध्ये मंदिराचे पुनर्निर्माण केले आणि त्यांचा पुत्र खेङ्गाराने शिवलिंगाची पुनःप्रतिष्ठा केली.यानंतर झफर खानने १३९५ मध्ये मंदिर उद्ध्वस्त करून तेथे जामा मशिद आणि प्रशासकीय ठाणे उभारल्याचे उल्लेख आहेत. पुढे महमूद बेगडा, पोर्तुगीज आक्रमक, आणि नंतर औरंगजेब यांच्या आदेशाने १६६५ आणि १७०६ मध्ये पुन्हा विध्वंस घडवून आणण्यात आला. पुजाऱ्यांची हत्या, मंदिर परिसरातील अपवित्र कृत्ये आणि संपूर्ण रचना पाडण्याचे प्रयत्न झाले; परंतु तीर्थक्षेत्र टिकून राहिले.जरी मंदिर वारंवार उद्ध्वस्त झाले, तरी स्मृती कधीच नष्ट झाली नाही. इ.स. १७८२–८३ मध्ये पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या वैयक्तिक निधीतून सोमनाथाजवळ नवीन दगडी मंदिर उभारले. हे मंदिर १९व्या आणि २०व्या शतकात सोमनाथच्या श्रद्धेचे केंद्र राहिले.१८४२ मध्ये ब्रिटिश गव्हर्नर–जनरल लॉर्ड एलेनबरो यांनी अफगाणिस्तानातील महमूद गझनीच्या कबरीतून चंदनाचे दरवाजे आणले आणि ते सोमनाथचे मूळ दरवाजे असल्याचा खोटा दावा केला. हा ब्रिटिश सत्तेचा हिंदू समाजाचे समर्थन मिळवण्यासाठी आणि ब्रिटिश राजवटीला वैध ठरवण्यासाठी राजकीय प्रचार होता. हे दरवाजे नंतर आग्रा किल्ल्यात ठेवण्यात आले.१९२२ मध्ये के.एम. मुन्शी यांनी सोमनाथचे भग्नावशेष पाहिले. त्यांनी त्या अनुभवाचे वर्णन भक्ती आणि लज्जा असे केले आणि याच अनुभवातून त्यांच्या मनात मंदिर पुनर्निर्माणाची आजीवन बांधिलकी निर्माण झाली.

स्वातंत्र्यानंतर सोमनाथच्या इतिहासाचे अंतिम पर्व सुरू झाले. ऑक्टोबर १९४७ मध्ये जुनागढ भारतात विलीन झाले आणि हिंदूंना मंदिर दुरुस्तीवरील बंदी हटवण्यात आली. १२–१३ नोव्हेंबर १९४७ रोजी सरदार पटेल, एन. व्ही. गाडगीळ आणि जामसाहेब यांनी भग्नावशेषांना भेट दिली. तेव्हा पटेलांनी जाहीर केले: या शुभ नववर्षदिनी आम्ही सोमनाथ मंदिर पुनर्निर्माणाचा निर्णय घेतला आहे.

जुनागढ प्रशासन आणि जामसाहेबांनी तत्काळ देणग्या दिल्या. सुमारे ५,००० एकर जमीन मंदिर, संस्कृत विद्यापीठ आणि सांस्कृतिक केंद्रासाठी राखीव ठेवण्यात आली.

यानंतर वाद निर्माण झाला. महात्मा गांधींच्या सल्ल्यानुसार सरकारने थेट निधी न देता लोकवर्गणीतून मंदिर उभारण्याचा निर्णय घेतला, जेणेकरून हे राज्यप्राय धार्मिक प्रकल्प न राहता लोकसहभागातून उभे राहिलेले सांस्कृतिक पुनरुत्थान ठरेल.दरम्यान, तत्कालीन प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरु यांनी या प्रकल्पाला ‘हिंदू पुनरुत्थानवाद’ म्हणून विरोध केला. परंतु सार्वजनिक देणग्यांमुळे प्रकल्प थांबवता आला नाही.१५ डिसेंबर १९५० रोजी सरदार पटेल यांचे निधन झाले, तरी काम सुरूच राहिले. अखेर ११ मे १९५१ रोजी राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. सोमपुरा शिल्पकारांनी बांधलेल्या मारू–गुर्जर शैलीतील मंदिरात नवीन ज्योतिर्लिंगाची स्थापना झाली. शतकानुशतके कुजबुजत राहिलेली प्रतिज्ञा अखेर दगडात साकार झाली. नेहरू या समारंभाला उपस्थित नव्हते.आज सोमनाथ हे केवळ पर्यटनस्थळ किंवा धार्मिक प्रतीक नाही; ते दगड आणि गाळात लिहिलेले भारतीय संस्कृतीचा इतिहासग्रंथ आहे. त्याची खरी ओळख अखंड वैभवात नसून प्रत्येक विध्वंसानंतर पुन्हा उभे राहण्याच्या मानवी निर्णयात आहे. त्याच्या पायाभूत थरांमध्ये हडप्पाकालीन वसाहती, प्राचीन व्यापारी आणि शांतीच्या शोधात आलेले भक्त सामावलेले आहेत. प्रत्येक पुनर्निर्माण–मैत्रक राजे, सोलंकी सम्राट, मराठा राण्या किंवा नवस्वतंत्र भारत यांना ही समाप्ती नाही; आम्ही पुन्हा उभारू हा एक जाणीवपूर्वक केलेला उच्चार होता.

सोमनाथ आपल्याला शिकवते की लवचिकता म्हणजे कधीही न पडणे नव्हे, तर पडूनही कायमचे न राहणे–पुन्हा पुन्हा उभे राहणे. समुद्रकिनारी उभे असलेले हे मंदिर केवळ भगवान शिवाचे स्मारक नाही; तर त्या अदम्य मानवी आत्म्याचे प्रतीक आहे, जो शतकानुशतके समुद्राच्या काठावर येऊन शांतपणे म्हणत राहतो–

आम्ही अजूनही येथे आहोत.आम्ही स्मरण ठेवतो.आम्ही पुन्हा उभारतो.आम्ही टिकून राहतो.



**ब्रिजेश सिंह**
**, प्रधान सचिव तथा महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय–**

# कर्मचाऱ्यांना डिजिटल स्व- गणना सक्तीची; प्रमुखांवर जबाबदारी

## १५ मेपर्यंत स्व–गणना करावी, आयुक्त वर्षा लड्डा यांचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात होणाऱ्या घर यादी व घरगणना प्रक्रियेसाठी महानगरपालिका प्रशासनाने कंबर कसली आहे. या प्रक्रियेत पारदर्शकता आणि अचूकता आणण्यासाठी डिजिटल स्व–गणनेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. या संदर्भात आयुक्त वर्षा लड्डा यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना स्वतःची गणना अनिवार्यपने पूर्ण करण्याचे निर्देश दिलेले आहेत



या परिप्रत्रकानुसार १ ते १५ मे या कालावधीत शासनाच्या अधिकृत पोर्टलवर डिजिटल पद्धतीने स्व गणना करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. नागरिकांनी आणि विशेषतः कर्मचाऱ्यांनी शासनाच्या

http//se.census.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर आपली माहिती नोंदवावी, असे आवाहन महापालिका प्रशासनाकडून करण्यात आलेले आहे. या प्रक्रियेत विचारण्यात आलेल्या ३३प्रश्नांची अचूक उत्तरे देऊन नागरिक स्वतःची माहिती ऑनलाईन भरू शकणार आहेत. या आधुनिक पद्धतीमुळे माहिती भरण्याची अधिक सुरक्षित आणि सुलभ होणार आहे. महानगर पालिका मुख्य कार्यालय, सर्व झोन कार्यालय, सर्व कार्यालय तसेच महानगरपालिकेत कार्यरत अस्थायी कर्मचारी यासर्वांनी ही स्व–गणना करणे आवश्यक आहे, असे आयुक्त वर्षा लड्डा यांनी स्पष्ट केले आहे. सर्व कार्यालय प्रमुख यांना त्यांच्या अखत्यारीतील कर्मचाऱ्यांनी स्व–गणना पूर्ण केल्याची खातरजमा करण्याचे निर्देश दिलेले आहेत.कर्मचाऱ्यांनी स्व–गणनेनंतर प्राप्त होणारे डिजिटल प्रमाणपत्र कार्यालय प्रमुखांकडे सादर करण्याच्या सुचना मनपा आयुक्त वर्षो लड्डा यांनी दिलेल्या आहेत.

# सहाय्यक कृषि अधिकारी अमोल चौकडे यांना तिफण गौरव पुरस्कार प्रदान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३चांदूर रेल्वे–**

आपल्या विशेष कृषि विस्तार कार्यासाठी परिचित असलेलेचांदूर रेल्वे येथील तालुका कृषि अधिकारी कार्यालयातील अधिनस्थ सहाय्यक कृषि अधिकारी अमोल ज्ञानेश्वर चौकडे यांना तिफण गौरव पुरस्काराने पुणे येथे सन्मानित करण्यात आले.



राज्यातील कृषि विषयक विशेष कार्य करणाऱ्या कर्मचारी अधिकाऱ्यांना पूणे येथे या कृषी गौरव पुरस्कारांचे वितरण कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांचे हस्ते करण्यात आले. परंतु काही अपरिहार्य कार्यामुळे कार्यक्रमात न पोहोचू शकल्यामुळे अमोल चौकडे यांना हा पुरस्कार तिफण फाउंडेशनचे सर्व पदाधिकाऱ्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सोयाबीन, तूर,कपाशी व हरभरा पिकांमधील सुधारित पीक पेरणी पद्धतीचा प्रचार प्रसार व अंमलबजावणी करणे. त्याचप्रमाणे कृषी माहिती वेगवेगळ्या स्वरूपात शेतकरी बांधवांना देण्याच्या पद्धतीमध्ये कार्टून चैनल ची निर्मिती व कार्टून द्वारा वेगवेगळ्या योजनांची तसेच पिकाच्या प्रत्येक परिस्थितीत उपयुक्त माहिती देणे,तसेच कृषि अधिकारी कृषि कर्मचारी व कृषि विभागातील इतर प्रकल्पातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना सर्व योजना विषयक मार्गदर्शन करण्याचे कार्य ते सतत करत असतात. त्याच प्रकारे पर्यावरण विषयक कार्यामध्ये बालसंस्कार शिबिरे, शाळा व इतर कृषि महोत्सवात मुलांना पाणी व मातीचे महत्त्व तसेच पर्यावरणात मित्र किडींचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन करण्याचे कार्य ते सतत करत असतात. या कृषिविषयक सतत करण्यात येणाऱ्या उत्कृष्ट कार्यप्रणालीमुळे त्यांना महाराष्ट्र राज्यातून कृषि विस्तार कार्यासाठी गौरविण्यात आले.या गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांच्या कार्यक्षेत्रातील शेतकरी बंधू–भगिनी, कृषि कार्यालयातील सहकारी तसेच त्यांचा मांजरखेड व नागपूर येथील मित्रपरिवार यांनी त्यांचे कौतुक केले आहे.

# १ जानेवारी २०११ पर्यंतची निवासी अतिक्रमणे होणार नियमित

## पात्र लाभार्थ्यांनी ३१ डिसेंबर पर्यंत अर्ज सादर करावे – एसडीओ श्रद्धा उदावंत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३चांदूर रेल्वे–** चांदूर रेल्वे उपविभागातील चांदूर रेल्वे, नांदगाव खंडेश्वर आणि धामणगाव रेल्वे तालुक्यातील सर्व नागरिकांना निवासी अतिक्रमण नियमितीकरण योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन उपविभागीय अधिकारी श्रद्धा उदावंत यांच्यातर्फे करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाच्या २५ मार्च २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार शासकीय जमिनीवर वर्षानुवर्षे राहणाऱ्या कुटुंबांना हक्काचे घर मिळावे या उद्देशाने ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. ही मोहीम जिल्हाधिकारी अमरावती यांच्या मार्गदर्शना खाली राबविली जात आहे. २५ मार्च २०२६ रोजीचे शासन निर्णयानुसार, १ जानेवारी २०११ पर्यंतची अतिक्रमणे योजनेंतर्गत नियमितीकरणास पात्र आहेत. ज्यांचे अतिक्रमण ५०० चौरस फुट आहे. त्यांना नियमितीकरणा साठी कोणतेही शुल्क नाही. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता कलम ४०, ५२ व ६४ नुसार ही प्रक्रिया राबवली जात आहे. १ जानेवारी २०११ रोजी निवासी अतिक्रमण असल्याच्या पुराव्यासाठी मतदार यादीतील नाव (संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीकरीता वार्ड / प्रभागनिहाय तयार केलेल्या मतदार याद्या), वीज बिल, मालमत्ता कराची पावती, ग्रामपंचायत मधील आठ अ उतारा, अतिक्रमण सर्वेक्षण नोंदवही, झोपडपट्टी घोषणेची अधिसुचना, उपग्रह छायाचित्र वगैरे पुरावे ग्राह्य धरले जातील. तरी सदर योजनेकरीता पात्र नागरिकांनी आपले अर्ज आवश्यक कागदपत्रांसह संबंधित ग्राम विकास अधिकारी (ग्रामपंचायत) व संबंधित नगर परिषद / नगरपालिका प्रशासन या ठिकाणी ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत सादर करावेत. जे नागरिक या मुदतीत अर्ज करणार नाहीत, त्यांच्यावर भविष्यात प्रशासना कडून कारवाई होण्याची शक्यता असल्याने, नागरिकांनी त्वरित अर्ज सादर करावेत. तसेच पर्यावरण आणि सार्वजनिक हित लक्षात घेता २५ मार्च २०२६ रोजीचे शासन निर्णयानुसार नद्या, नाले आणि सार्वजनिक रस्ते, वनजमीन आणि भूस्खलन प्रवण क्षेत्र, वेटलैंड किंवा सीआरझेड क्षेत्र इत्यादी ठिकाणची कोणतीही अतिक्रमणे नियमित केली जाणार नाहीत. तरी ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत अर्ज करून जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी सदर योजनेचा लाभ घ्यावा व कायदेशीररीत्या आपले घराचे स्वप्न पूर्ण करावे. काही अडचणी असल्यास थेट उपविभागीय अधिकारी कार्यालय, चांदूर रेल्वे किंवा तहसील कार्यालय, चांदूर रेल्वे, नांदगाव खंडेश्वर, धामणगाव रेल्वे या कार्यालयाशी संपर्क साधावा, असे जाहिर आवाहन चांदूर रेल्वेच्या उपविभागीय अधिकारी श्रद्धा उदावंत यांच्यातर्फे करण्यात आले आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब – पोर्टल /ई – पेपर

# अमरावतीतील उत्सव मेळा हत्याकांड प्रकरणी मुख्यमंत्री व गृहमंत्र्यांकडे कठोर कारवाईची आ.रवि राणा यांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

अमरावती महानगरपालिका हद्दीतील सायन्सकोर मैदानावर सुरू असलेल्या ‘ उत्सव मेला २०२६’ दरम्यान झालेल्या व्यापारी हत्याकांड प्रकरणी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे कठोर कारवाईची मागणी करण्यात आली आहे.दि. ७ मे २०२६ रोजी मेळ्यातील अंतर्गत वादातून पश्चिम बंगालमधील वर्धमान




येथील ५३ वर्षीय व्यापारी अभिजीत सुकुमार कर यांच्यावर चाकूने हल्ला करण्यात आला होता. या हल्ल्यात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या प्रकरणात मलिक तरबेज खान, अजीस खान, रहीम खान, हप्पू खान, अहमद खान, सोनू खान व विक्की खान यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले आहेत.निवेदनात संबंधित घटना ही संघटित गुन्हेगारी स्वरूपाची असल्याचा आरोप करण्यात आला असून सर्व आरोपींचे मोबाईल कॉल डिटेल रेकॉर्ड (उऊळ), कॉल तपासणी तसेच घटनास्थळी करण्यात आलेले चित्रीकरण तपासण्याची मागणी करण्यात आली आहे.तसेच आरोपींवर ८ दिवसांच्या आत कठोर कारवाई करून त्यांच्या मालमत्तांवर बुलडोजर कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. भविष्यात अशा घटना रोखण्यासाठी कठोर पावले उचलणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.याशिवाय आरोपींच्या कुटुंबियांना मिळणारे शासकीय व निमशासकीय योजनांचे लाभ बंद करण्याची मागणीही करण्यात आली आहे. या संदर्भात अमरावती पोलीस आयुक्तांना तातडीने निर्देश देण्यात यावेत, अशी विनंती मुख्यमंत्री कार्यालयाकडे करण्यात आली आहे.

# पालकमंत्री बावनकुळे यांचे थेट आदेश आणि एएसआय अशोक वाटाणे निलंबित

## रात्री दोन वाजता निघाले निलंबनाचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे सोमवारी रात्री सांस्कृतीक भवनमधून बाहेर जात असताना काही नागरिकांसोबत बोलत होते. त्यादरम्यान गाडगेनगर ठाण्यातील खुफिया अशोक वाटाणे यांनी त्यांचे फोटो काढले. ही बाब पालकमंत्र्यांच्या निदर्शनास येताच त्यांनी दोन्ही डिसीपींना बोलावून संबंधित कर्मचाऱ्याला निलंबीत करण्याचे



आदेशदिले. रात्री २ वाजता पोलीस उपायुक्त गणेश शिंदे यांनी एएसआय अशोक वाटाणे यांच्या निलंबनाचा आदेश निर्गमित केला.भाजपाचे शहर जिल्हा अध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांचा सोमवारी वाढदिवस असल्यामुळे सांस्कृतीक भवन येथे त्यांच्या वाढ दिवसानिमीत्त अभिष्टचिंतनसोहळा होता. कार्यक्रमाला जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित राहणार असल्यामुळे भाजपाचे सर्व नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने हजर होते. रात्री १० वाजताच्या सुमारास कार्यक्रम आटोपल्यानंतर पालकमंत्री बाहेर निघाले तेव्हा काही व्यक्ती एका गुन्ह्यासंदर्भात त्यांना भेटले आणि घडलेला प्रकार ते पालकमंत्र्यांना सांगत होते. त्यावेळी गाडगेनगर ठाण्यातील खुफिया अशोक वाटाणे यांनी स्वतःचा मोबाईल काढला आणि पालकमंत्री व संबंधित नागरिकांचा फोटो काढत होते. पालकमंत्र्यांच्या हे लक्षात येताच त्यांनी कर्मचाऱ्याला रागाने बोलावून विचारपूस केली. तो पोलीस कर्मचारी असल्याचे उघड होताच त्यांनी दोन्हीपोलीस उपायुक्तांना बोलाविले आणि संबंधित कर्मचाऱ्याची चांगलीच खरडपट्टी काढली. भडकलेल्या पालकमंत्र्यांनी लगेच कर्मचाऱ्याला निलंबीत करण्याचे आदेश डिसीपींना दिले. पालकमंत्र्यांचा राग पाहता रात्रीच संबंधित बाबूला बोलावून २ वाजता पोलीस कर्मचारी अशोक वाटाणे यांना निलंबीत करण्यात आले. या कारवाईमुळे पोलीस दलात चांगलीच खळबळ उडाली असून कर्मचाऱ्यांत चांगल्याच चर्चा सुरू आहेत.

# भूमिपूजन झाले तेथेच होणार शासकीयवैद्यकीय महाविद्यालय

## आयडेंटीफाईड फॉरेस्टची जागा अनारक्षित करण्याची कार्यवाही सुरु

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१३अमरावती**

बडनेरा येथील कोंडेश्वर-अलियाबाद परिसरात उभारण्यात येणाऱ्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला अंतिम मंजुरी मिळाली असल्याचा दावा आमदार रवी राणा यांनी केला आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक ऑक्टोबर २०२४ रोजी ऑनलाइन भूमिपूजन करून या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला हिरवी झेंडी दाखविली होती. यावेळी कोंडेश्वर-अलियाबाद येथे झालेल्या भूमिपूजन कार्यक्रमाप्रसंगी प्रामुख्याने आमदार रवी राणा, माजी खासदार नवनीत राणा, राज्यसभा खासदार अनिल बोंडे तसेच विविध प्रशासकीय अधिकारी प्रमुख उपस्थित होते. बडनेरा मतदारसंघासाठी अत्यंत महत्त्वाच्या ठरणाऱ्या या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या जागेबाबत अनेक दिवसांपासून चर्चा सुरू होती. दरम्यान, आमदार रवी राणा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन कोंडेश्वर-अलियाबाद येथील जागेवरच महाविद्यालय उभारण्याची मागणी केली होती. त्यानंतर मुख्यमंत्री यांनी या जागेवरच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उभारण्याचा अंतिम निर्णय घेत शिक्कामोर्तब केले. त्यामुळे आता जागेबाबत सुरू असलेल्या सर्व चर्चांना पूर्णविराम मिळाला असल्याचे रवी राणा यांचे म्हणणे आहे.



उपवनसंरक्षक, अमरावती वनविभाग यांच्या पत्रानुसार संबंधित जागेसंदर्भातील सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्या असून आता या जागेमध्ये कोणताही बदल होणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या एकूण प्रकल्पासाठी सुमारे १६०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून त्यापैकी पहिल्या टप्प्यातील ४०३ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. लवकरच प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात होणार असल्याची माहिती रवी राणा यांनी दिली. या महाविद्यालयामुळे अमरावती जिल्ह्यासह विदर्भातील विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणाची मोठी संधी उपलब्ध होणार असून आरोग्य सुविधांमध्येही मोठी भर पडणार आहे. दरम्यान, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची जागा बदलविण्याच्या मुद्द्यावरून कोणीही राजकारण करू नये, असा सल्लाही रवी राणा यांनी दिला.

# उद्यापासून पाणी पुरवठा देखभाल दुरुस्तीची कामे बंद

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कंत्राटदार आक्रमक



**विदर्भ प्रजासत्ताकदि.१३अमरावती**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील तब्बल १८.८१ कोटी रुपयांची प्रलंबित देयके न मिळाल्याने अमरावती जिल्हा जीवन प्राधिकरण कंत्राटदार असोसिएशनने देयकांच्या मागणीसाठी ६ मेपासून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयासमोर बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू केले. सात दिवस उलटून अद्यापपर्यंत अधिकारी किंवा शासनाने आंदोलनाची कुठलीही दखल घेतलेली नाही. परिणामी कंत्राटदार असोसिएशनने आंदोलन तीव्र केले असून १४ मेपासून पाणीपुरवठा देखभाल व दुरुस्तीची सर्व कामे बंद करण्याचा इशारा दिला आहे.असोसिएशनचे अध्यक्ष नितीन आर. काळे, उपाध्यक्ष संजय ए. सिंह, सचिव अनिल भटकर व मार्गदर्शक धनंजय बंड यांनी दिलेल्या निवेदनानुसार सन २०२४-२५ व २०२५-२६ या कालावधीतील एकूण १८.८१ कोटी रुपयांची देयके मुंबई येथील मध्यवर्ती कार्यालयाकडे प्रलंबित आहेत.निधीअभावी १ एप्रिल २०२६ पासून पाणीपुरवठ्याशी संबंधित कामे बंद करण्याचा निर्णय यापूर्वी घेण्यात आला होता. मात्र, एप्रिलमध्ये निधी वितरित करण्याचे आश्वासन प्रशासनाने दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.त्यानंतर १५ एप्रिल रोजी मुंबई येथे संचालक (वित्त) यांच्यासोबत झालेल्या बैठकीत ८ ते १० दिवसांत निधी वितरित करण्याचे आश्वासन देण्यात आले. मात्र एप्रिल संपूनही अद्याप देयके न मिळाल्याने कंत्राटदारांमध्ये तीव्र नाराजी आहे. प्रलंबित देयकांमुळे आर्थिकपरिस्थिती डबघाईला आल्याचे सांगत कंत्राटदारांनी १४ मेपासून देखभाल व दुरुस्तीची सर्व कामे थांबविण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत होऊन जनआक्रोश निर्माण झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

# मोझरी बायपासवर २१ गोवंशांची सुटका

## २६.२० लाखांचा मुद्देमाल जप्त – अवैध गोवंश वाहतूक पुन्हा उघड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३तिवसा-** तिवसा पोलिसांनी अवैध गोवंश वाहतुकीविरोधात पुन्हा एकदा धडाकेबाज कारवाई करत मोझरी बायपास परिसरात मध्यरात्री सापळा रचून २१ लहान-मोठ्या गोवंशांची सुटका केली. या कारवाईत एमएच ४० सीटी ०१७२ क्रमांकाचे आयशर वाहन जप्त करण्यात आले असून गोवंश व वाहन असा मिळून २६ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या कारवाईमुळे अवैध जनावर वाहतूक करणार्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

रात्री ११.३० ते पहाटे २ वाजेदरम्यान तिवसा पोलिसांनी मोझरी बायपासवर अमरावतीच्या दिशेने जाणार्या वाहनांवर कडक नजर ठेवत नाकाबंदी केली होती. संशयास्पद वाहनांची कसून तपासणी सुरू असताना एका आयशर वाहनाला थांबवून तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान वाहनामध्ये २१ गोवंशांची अमानुष पद्धतीने कोंबून अवैधरित्या वाहतूक सुरू असल्याचे उघडकीस आले.

याप्रकरणी पोलिसांनी प्रफुल संतोषवार (वय ३६, रा. बुटीबोरी, नागपूर) व हरीश शिवा राठोड (वय ३०, पोराबंदी) यांना ताब्यात घेत त्यांच्याविरुद्ध संबंधित कायद्यान्वये



गुन्हा दाखल केला आहे. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालात आयशर वाहन व गोवंशांचा समावेश असून एकूण किंमत २६ लाख २० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. ही उल्लेखनीय कारवाई पोलिस निरीक्षक गोपाल उपाध्याय यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या मोहिमेत प्रकाश सोनवणे, रवींद्र लांजेवार, नंदू जोगदंड, सागर शिरसागर, रोशन आठवले, सागर डोंगरे तसेच चालक प्रदीप मस्के यांनी धाडसी भूमिका बजावत कारवाई यशस्वी केली.तिवसा पोलिसांच्या या सतर्कतेमुळे अवैध गोवंश वाहतुकीला मोठा आळा बसला असून, कायद्याचा धाक निर्माण करण्यासाठी अशा कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

# निष्पाप शेतकऱ्याला ‘हनी ट्रॅप’मध्ये अडकवून ७० लाख लुटले

## मोबाइल रिचार्ज करणे महागात पडले, अमरावतीच्या दांपत्यावर खंडणीचा गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती-**

महाराष्ट्र राज्यातील अमरावती जिल्ह्यात एक संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. शेतजमीन विक्रीतून मिळालेल्या कोट्यवधी रुपयांवर डोळा ठेवून एका ६४ वर्षीय ज्येष्ठ शेतकऱ्याला ‘हनी ट्रॅप’मध्ये अडकवण्यात आले आहे. केवळ मोबाइल रिचार्ज करण्याच्या निमित्ताने ओळख वाढवून, अत्याचाराच्या खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची भीती दाखवत एका दांपत्याने या वृद्धाला तब्बल ७० लाख रुपयांनी लुटले. याप्रकरणी नांदगाव पेठ पोलिसांनी दांपत्याविरुद्ध खंडणीचा गुन्हा दाखल केला आहे. हा शेतकरी मूळचा नांदगाव पेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील रहिवासी असून त्याचे शहरात स्वतःचे घर आहे. गाडगेनगर भागात आरोपी दांपत्याचे मोबाइलचे दुकान आहे. मोबाइल रिचार्ज करण्यासाठी हा शेतकरी या दुकानात नियमित जात असे. तेथूनच त्यांची या दांपत्याशी ओळख झाली. पुढे महिलेने शेतकऱ्याशी जवळीक वाढवली आणि त्यांच्यात संमतीने संबंध प्रस्थापित झाले.यानंतर मात्र महिलेने आणि तिच्या पतीने संगनमत करून या शेतकऱ्याला अत्याचाराच्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी देणे सुरू केले. बदनामीच्या आणि कारवाईच्या या भीतीमुळे प्रचंड दडपणाखाली असलेल्या या वृद्धाने गेल्या चार वर्षांत टप्प्याटप्प्याने तब्बल ७० लाख रुपये या दांपत्याला दिले. अखेर रात्री उशिरा या शेतकऱ्याने नांदगाव पेठ पोलिसांत धाव घेत तक्रार दिली. यावरून पोलिसांनी हनी ट्रॅप रचणाऱ्या महिलेसह तिच्या पतीवर विविध गंभीर कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे.

### जमीन विक्रीतून आले होते दोन ते अडीच कोटी

या शेतकऱ्याने २०२० मध्ये आपली शेतजमीन विकली होती. या व्यवहारातून त्याला दोन ते अडीच कोटी रुपये मिळाले होते. हीच मोठी रक्कम शेतकऱ्याकडे असल्याची माहिती या दांपत्याला समजली होती. पैशांच्या याच लालसेपोटी महिलेने आणि तिच्या पतीने अत्यंत सुनियोजितपणे हे मायाजाल विणले आणि त्यात या निष्पाप शेतकऱ्याला ओढले.

# घरफोडी करणाऱ्या सराईत टोळीतील दोघे मध्यप्रदेशातून जेरबंद

## १८ लाखांचा मुद्देमाल जप्त, नागपूर,अमरावती येथे केल्यात घरफोड्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती** घरफोडी करणाऱ्या सराईत टोळीतील दोघांना शहर गुन्हे शाखेच्या पथकाने मध्यप्रदेशातून अटक करून त्यांच्या ताब्यातून १८ लाख ७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तसेच टोळीतील चार पसार आरोपींच्या शोधात पो-लीस आहेत. अशोकसिंह प्रतापसिंह शिकलीकर (वय ३३) आणि धिरज शामलाल केसरवाणी (वय ३५ दोन्ही रा. सिगणोर ता. गोगावा जि. खरगोण, मध्य प्रदेश) अशी अटकेतील चोरट्यांची नावे आहेत. तर राहुल प्रधानसिंह शिकलीकर, जागरसिंह दयालसिंह शिकलीकर, राजेन्द्रसिंह जितसिंह शिकलीकर आणि संदीपसिंह सोनारसिंह



शिकलीकर (सर्व रा. मध्य प्रदेश) अशी पसार आरोपींची नावे आहेत.शहरात चोरी व घरफोडीच्या घटना सातत्याने समोर येत आहे.जानेवारी ते १२ मेदरम्यान शहरात १९७ घरफोडी व चोरीच्या घटना घडल्याची नोंद पोलीस दप्तरी आहे. फ्रेजरपुरा ठाण्याच्या हद्दीत काही दिवसापूर्वी घरफोडीप्रकरणी झालेल्या पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली असता मध्य प्रदेश येथील सराईत चोरटा अशोकसिंह शिकलीकर याने चोरी केल्याची माहिती समोर आली. पोलिसांचेएक पथक ६ मेपासून त्याच्या शोधात मध्य प्रदेशात होते. परंतु अशोकसिंह मोबाईल वापरत नाही आणि तो एका जागी राहत नसल्यामुळे पोलीस त्याच्या गावालगत जंगल भागात त्याच्या शोधात होते. मंगळवारी सकाळी अशोकसिंह व धिरज गावात आल्याची माहिती मिळताच पोलिसांनी दोघांना जंगलातून अटक केली आणि अमरावतीला आणलेत्यांची कसून चौकशी केली असता त्यांनी अमरावतीसह नागपुर येथे ८ घरफोड्या केल्याची कबुली दिली. तसेच दोघांच्या ताब्यातून ३७.५ ग्रॅम सोन्याची लगड, १४० ग्रॅम चांदिची लगड, रोख १० हजार रुपये आणि चारचाकी असा एकूण १८ लाख ७हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त व दोघांना अटक केली. या कारवाईमध्ये पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे, रमेश धुमाळ, एसीपी शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनात गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांच्या नेतृत्वात सपोनि महेश इंगोले, पोलीस अंमलदार गजानन ढेवले, मनोज ठोसर, आस्तिक देशमुख, मंगेश परिमल, नईम बेग, अतुल संभे, विकास गुडधे, नाजीमोद्दीन, वाकपांजर, निखील गेडाम, रणजीत गावंडे, योगेश पवार, चेतन गुल्हाणे, संदीप खंडारे आणि सौरभ काळबांडे यांचा समावेश आहे.

# भातकुली तालुक्यातील बोरखडी खू व इस्माइलपुर ठरले स्व गणना पूर्ण करणारे जिल्ह्यातील पहिजे गाव



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

भारत सरकारच्या जनगणना विभागामार्फत दिनांक १ मे पासून स्व गणना सुरू झालेली आहे.याबाबत जिल्हाधिकारी अमरावती यांनी नागरिकांना स्व गणना पूर्ण करण्याचे आवाहन केले होते.सदर आव्हानाला जिल्ह्यातील नागरिकांनी उत्तम प्रतिसाद देत भातकुली तालुक्यातील बोरखडी खू व इस्माइलपुर या गावातील सर्व कुटुंबांनी स्व गणना पूर्ण केली.अशा प्रकारे १००% स्व गणना पूर्ण करणारे जिल्ह्यातील पहिले गाव बोरखडी खू व इस्माइलपुर ठरले.या गावांचा आदर्श घेत जिल्ह्यातील जास्तीत जास्त कुटुंबांनी १५ मे पर्यंत स्व गणना पूर्ण करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी अमरावती यांनी केले.निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे व तहसीलदार अक्षय मांडवे यांचे मार्गदर्शनात सदर काम पूर्ण करण्यात आले. मंडळ अधिकारी संतोष धुर्वे,गौरव सुरपाटणे,ग्राम महसूल अधिकारी व्ही बी बिहाडे, व्हि. बी दहाट, धम्मपाल वानखडे,महसूल सेवक सीमा वानखडे,प्रशांत बिरे यांनी याबाबत विशेष परिश्रम घेतले


## विदर्भातील शाळा १५जुनला सुरु करण्याच्या विरोधात

# शिक्षक समितीची नागपूर उच्च न्यायालयात याचिका दाखल

### पुढिल सुनावणी ९जुनला



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती :** विदर्भातील शाळांचे शैक्षणिक वर्ष सुरू करण्यासंबंधाने महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने उच्च न्यायालय,नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली आहे (४०६७/२०२६)१२मेला याचिकेची सुनावणी सुट्टी कालीन न्यायाधीश रजनिश व्यास साहेब यांचेकडे झाली.शिक्षक समिती याचिकाकर्त्याचे वतीने अ‍ॅड. (डॉ.) बी. जी. कुलकर्णी काम पाहत आहेत.प्रतिवादी शासनाकडे नोटीस पाठविण्यात आल्या आहेत.पुढील सुनावणी ९ जून २०२६ रोजी होईल.अशी माहीती प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे यांनी दिल्याचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.सुट्ट्याबाबत राज्यात एकसमानता येण्यासाठी राज्य शासनाने १५ जुनपासून शाळा सूरू करण्याचा निर्णय घेतला. पण यास विदर्भात विरोध होत आहे. त्याचे विविध कारणे दिल्या जातात. महाराष्ट्रातील सर्वच विभागातील शाळा दरवर्षी १५ जूनला सुरू करण्यासाठी २००७ मध्ये शासन निर्णय काढला होता. या निर्णयाला विरोध म्हणून विदर्भात शिक्षक समितीसह अन्य काही शिक्षक संघटनांनी आंदोलन केले.शेवटी




मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठात (सिटिझन फोरम महाराष्ट्र सह, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, पुरोगामी शिक्षक संघटना, शिक्षक सेना) या तीन शिक्षक संघटनांनी या सर्व पिटीशनमध्ये कोर्टाने जो निकाल दिला होता, उच्च न्यायालयाने विदर्भ शाळा सुरू करण्याबाबतचा निकालाचा संदर्भ दिल्या जात आहे.

# भेसळ करणाऱ्या व्यापाऱ्यांचे परवाने होणार रद्द!, पणन संचालकांचे आदेश

### कृत्रिम रसायनांचा वापर पडणार महागात, विक्रेत्यांमध्ये धास्ती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती**

बाजारात विक्रीस येणारी फळे, भाजीपाला आणि अन्नधान्यात कृत्रिम रसायनांचा वाढता वापर व्यापार्‍यांच्या अंगलट येण्याची चिन्हे आहेत. फळे कृत्रिमरित्या पिकविणे, गोडी वाढविणे, आकर्षक रंग आणणे तसेच माल दीर्घकाळ टिकवण्यासाठी घातक रसायनांचा वापर करणार्‍या व्यापार्‍यांविरोधात कारवाईचे आदेश पणन विभागाने दिले आहेत. दोषी आढळणार्‍यांचे थेट परवाने रद्द करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. बाजार समित्या, थेट पणन परवानाधारक व्यापारी आणि



जिल्हा उपनिबंधकांना याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आहेत. बाजार क्षेत्रात नियमित तपासणी मोहीम राबविण्याचे आदेश जारी करण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, फळे व भाजीपाल्यात भेसळयुक्त रसायनांचा वापर झाल्याचा संशय आल्यास अन्न व औषध प्रशासनाशी समन्वय साधून तातडीने नमुने तपासणीसाठी पाठविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सध्या बाजारात केमिकलच्या साहाय्याने आंबा, केळी, पपई यांसारखी फळे कृत्रिमरित्या पिकवली जात असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. काही व्यापारी अधिक नफा मिळवण्यासाठी ग्राहकांच्या आरोग्याशी थेट खेळ करत असल्याचे चित्र आहे. फळांना आकर्षक रंग आणण्यासाठी

आणि ताजी दिसण्यासाठी विविध घातक रसायनांचा वापर होत असल्याने नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर पणन संचालकांनी बाजार समित्यांना कठोर भूमिका घेण्याचे आदेश दिले आहेत. दोषी व्यापार्‍यांवर केवळ दंडात्मक कारवाई न करता त्यांचे परवाने रद्द करण्याची प्रक्रिया सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे बाजार समित्यांमध्येही खळबळ उडाली असून अनेक व्यापार्‍यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ करणार्‍यांना कोणतीही सूट दिली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे. आगामी काळात बाजार समित्यांमध्ये मोठ्या प्रमाणात तपासणी मोहीम राबविली जाणार असल्याने भेसळखोर व्यापार्‍यांचे धाबे दणाणले आहेत.

# ‘झेडपी’ची वाट पाहून ग्रामीण राजकारण थंडावले

## इच्छुकांना ‘खर्च’ वाया जाण्याची भीती; सर्वांनाच निवडणुकीची प्रतीक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती–** नगर परिषद निवडणुका संपताच जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांचा बिगुल वाजेल, अशी ग्रामीण भागातील राजकीय वर्तुळाला अपेक्षा होती. त्यामुळे इच्छुक उमेदवार, त्यांचे समर्थक आणि कार्यकर्ते तयारीला लागले होते. कोणत्या गटातून उमेदवारी मिळू शकते, कोणत्या गावात आपला प्रभाव वाढवायचा, कोणत्या कार्यकर्त्यांना सोबत घ्यायचे, याची आखणी सुरू झाली होती. मात्र, न्यायालयीन प्रक्रियेमुळे निवडणुकीचा मुहूर्त पुढे ढकलला गेला आणि रंगात आलेले राजकारण अचानक थंडावले.

आरक्षण जाहीर झाल्यानंतर राजकीय हालचालींना आणखी वेग आला होता. काही जागा अनपेक्षितपणे आरक्षित झाल्याने अनेकांचे स्वप्न एका क्षणात दूर गेले. तरीही राजकारणात मार्ग संपत नाही. ज्यांना स्वतः उमेदवारीची संधी उरली नाही, त्यांनी विश्वासातील व्यक्तीला पुढे करून सूत्रे आपल्या हातात ठेवण्याची तयारी केली होती. कार्यकर्त्यांच्या बैठका सुरू झाल्या. गावातील समारंभ, धार्मिक कार्यक्रम, अंत्यसंस्कार, वाढदिवस अशा प्रत्येक ठिकाणी इच्छुकांची उपस्थिती वाढली. नेत्यांच्या वाढदिवसानिमित्त चौकाचौकात लागलेले मोठमोठे बॅनर हे केवळ शुभेच्छांचे फलक नव्हते, ते भावी उमेदवारीचे संकेत होते. सोशल



मीडियावरही काही चेहरे अचानक सक्रिय झाले. स्थानिक प्रश्नांवरील पोस्ट, जनतेच्या समस्या मांडणारे व्हिडिओ आणि शुभेच्छांचा वर्षाव यामागे एकच उद्देश होता, तो म्हणजे लोकांच्या नजरेत राहणे. निवडणूक म्हणजे खर्चाचीही परीक्षा असते. कार्यकर्त्यांची मनधरणी, चहापाणी, प्रवास, बॅनर, सोशल मीडिया आणि सततचा संपर्क यासाठी अनेक इच्छुकांनी खर्च सुरू केला होता. काहींनी तर या निवडणुकीकडे आपल्या राजकीय भवितव्याच्या दृष्टीने निर्णायक संधी म्हणून पाहिले होते. मात्र, न्यायालयाने निवडणूक प्रक्रियेलाच स्थगिती दिली आणि रंगात आलेली ही सारी धावपळ अचानक थांबली. बैठकीची संख्या कमी झाली. चौकातील बॅनर कमी झाले. सोशल मीडियावरील उत्साह मंदावला. कार्यकर्त्यांच्या चर्चांमध्येही अनिश्चिततेची छाया दिसू लागली. ग्रामीण भागात जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका या लोकसभा किंवा विधानसभा निवडणुकांपेक्षा महत्त्वाच्या मानल्या जातात. या निकालांवरून ग्रामीण भागात नेत्यांची ताकद, संघटनशक्ती आणि प्रभावाचे मोजमाप केले जाते. आता आरक्षणात बदल झाल्यास पुन्हा नव्या उमेदवारांचा शोध घेणे व त्यांचा चेहरा जनतेपर्यंत पोचविण्याचे मोठे आव्हान नेत्यांपुढे असणार आहे. नगर परिषद निवडणुकांच्या अनुभवावरून जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकाही चांगल्याच खर्चिक होणार असल्याची शक्यता आहे. त्यामुळे निवडणुकीपूर्वी झालेला हा अतिरिक्त खर्च राजकारण्यांच्या कपाळावर आठ्या आणत आहे. आधीच संपूर्ण टर्म लांबलेली निवडणूक व त्यात आता पुन्हा अडथळे यामुळे ग्रामीण कार्यकर्त्यांमध्ये नाराजी आहे. निवडणुकीसाठी आणखी किती प्रतीक्षा करायची असा प्रश्न विचारल्या जात आहे.

## शंभूराजेंच्या जन्मोत्सवानिमित्त

# उद्याला भक्ती-शक्तीचा जागर

### लोकगायक यांच्या शिववाणीतून रंगणार संगीत सोहळा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती :** छत्रपती संभाजी महाराज यांच्या ३६९ व्या जयंतीनिमित्त अमरावतीत भक्ती, शौर्य आणि शिवसंस्कृतीचा जागर रंगणार आहे. छत्रपती संभाजी महाराज स्मारक समिती व शोध प्रतिष्ठान, अमरावतीच्या वतीने गुरुवार, १४ मे रोजी सायंकाळी ७ वाजता नवसारी रिंग रोड येथील स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज चौकात मानवंदना व भक्ती-शक्ती संगीत सोहळा पार पडणार आहे. अशी माहिती शोध प्रतिष्ठानचे अध्यक्ष यश खोडके यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ. संजय खोडके उपस्थित राहणार असून प्रमुख अतिथी म्हणून आ. सुलभा खोडके यांची उपस्थिती लाभणार आहे. विशेष आकर्षणामध्ये महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध लोकगायक यांचा शिव-शंभूच्या पराक्रमाला उजाळा देणारा भक्ती शक्ती संगीत सोहळा रंगणार आहे. तसेच अवधूत गांधी हे आपल्या दमदार आवाजातून शिवकालीन इतिहास, संतवाणी, वीररस आणि वारकरी परंपरेचा संगम घडविणार आहेत. कार्यक्रमस्थळी आकर्षक रोषणाई, ढोल पथक, शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा, शिवकालीन सजावट आणि दमदार वादन यामुळे परिसर शिवमय होणार आहे. यश खोडके यांनी पत्रकार परिषदेत माहिती देताना सांगितले की, नवसारी रिंग रोड चौकाला स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज चौक अशी ओळख मिळाल्यानंतर हा परिसर शिवप्रेमींसाठी प्रेरणास्थान बनला आहे. आमदार सुलभा खोडके यांच्या स्थानिक विकास निधीतून चौकाचे सुशोभीकरण करण्यात आले असून शंभूराजांच्या शौर्यगाथा दर्शविणारी भित्तीचित्रे येथे साकारण्यात आली आहेत.

स्मारक समितीच्या वतीने दरवर्षी जन्मोत्सव, राज्याभिषेक दिन आणि बलिदान दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. यंदाही हजारोंच्या संख्येने उपस्थित राहून शंभूराजांना मानवंदना अर्पण करण्याचे आवाहन यश खोडके यांनी केले आहे. पत्रपरीषदेला माजी महापौर अविनाश मार्डीकर, नगरसेवक चंदु खेडकर, संकेत महल्ले, आकाश हिवसे, ऋतुराज राऊत, मनिष पाटील, अभिमन्यु तायवाडे, सार्थक खोरगडे आदी उपस्थित होते.

# लक्ष्मी गॅस एजन्सीवर गंभीर आरोप

### आक्षेपार्ह वक्तव्याने संताप



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३ अमरावती**

अमरावती शहरातील रुक्मिणी नगर परिसरातील लक्ष्मी गॅस एजन्सीचा कथित मनमानी कारभार पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. एजन्सीच्या संचालकाने एका मुस्लिम महिलेशी आक्षेपार्ह भाषेत बोलत तुम्हाला पाकिस्तानमध्ये जावे लागेल असे वक्तव्य केल्याचा गंभीर आरोप नागरिकांनी केला आहे. या घटनेमुळे परिसरात संतापाची लाट उसळली असून संबंधितांवर कठोर कारवाईची मागणी करण्यात येत आहे.

माहितीनुसार, संबंधित महिला गॅस सिलेंडरचे खाते दुसऱ्या एजन्सीकडे हस्तांतरित करण्यासाठी गेली असता हा प्रकार घडल्याचा दावा करण्यात आला. घटनेनंतर संतप्त नागरिकांनी जिल्हाधिकारी कार्यालयात धाव घेत निवेदन सादर केले.

यावेळी नागरिकांनी एजन्सीविरोधात अनेक गंभीर तक्रारी केल्या. सिलेंडर बुकिंग करूनही वेळेवर गॅस मिळत नसल्याचा आरोप करण्यात आला. काही ग्राहकांच्या खात्यात सबसिडी जमा होत असली तरी प्रत्यक्षात सिलेंडर मिळत नसल्याचेही सांगण्यात आले. तसेच एजन्सीतील काही कर्मचारी अतिरिक्त पैसे घेऊन सिलेंडर ब्लॅकमध्ये विकत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. वितरण गाडीवरील कर्मचाऱ्याला सिलेंडर ब्लॅकमध्ये विकताना पकडल्याचा दावाही करण्यात आला.

या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी प्रशासनाकडे केली आहे.

## चालक व वाहकाने केली प्रवाश्याची

# तीन लाखांची पिवशी परत

### एसटी कर्मचाऱ्यांच्या प्रामाणिकतेचे कौतुक, महिलेने केले समाधान व्यक्त

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अंजनगाव सुर्जी**

स्थानिक वाहतूक नियंत्रक सय्यद वसीम यांच्या तातडीच्या कृतीने व चालक-वाहकाच्या प्रामाणिकतेने एका महिला प्रवाशाला सुमारे तीन लाख रुपयांचे दागिने आणि काही रोख रक्कम असलेली पिवशी परत मिळाली. त्यामुळे एसटी बस कर्मचाऱ्यांच्या या प्रामाणिकतेचे सर्वत्र कौतुक होत आहे. ही घटना रविवारी (ता. १०) घडली. अंजनगावसुर्जी तालुक्यातील दहिगाव रेचा येथील रहिवाशी महिला सुमन दादाराव चापके या गावी परत येण्यासाठी रविवारी (ता. १०) चोहोट्टा बाजार येथून अकोला आगाराच्या एमएच १४-एलएक्स-८८२८ क्रमांकाच्या अकोला ते परतवाडा बसमध्ये प्रवास करून अंजनगाव बसस्थानकात उतरल्या. त्यांच्या जवळ एक पिवशी होती. त्यात गळ्यातील सोन्याची पोथ व तीन हजार रुपये होते. सुमनबाई अंजनगाव बसस्थानकात उतरल्यानंतर काही वेळात त्यांच्या लक्षात आले की आपल्या कमरेला




तर पिवशी नाही, हे कळताच त्यांना मोठा धक्का बसला. त्या वाहतूक नियंत्रक सय्यद वसीम यांच्याकडे आल्या व बसमध्ये पिवशी पडल्याची माहिती दिली. तेव्हा वसीम यांनी तातडीने येथील बसस्थानक सोडून परतवाड्याकडे निघालेल्या बसच्या वाहकाचा मोबाईल नंबर घेऊन त्यांना फोन केला व बसमध्ये पिवशी राहिली आहे, तपासणी करा, अशा सुचना केल्या. तेव्हा चालक गोपाळ देशमुख यांनी बस थांबून वाहक संदीप झाडे यांनी बसमधील प्रवशांना माहिती दिली व पिवशीचा शोध घेतला. ज्या शीटवर सुमनबाई बसल्या होत्या त्या सीटखाली त्यांची पिवशी पडलेली दिसली. वाहक संदीप झाडे यांनी वाहतूक नियंत्रक सय्यद वसीम यांना पिवशी सर्व साहित्यासह मिळाल्याची माहिती दिली व परतीच्या प्रवासात अंजनगाव येथे परत करतो, असे सांगितले. तेव्हा सुमनबाईंना हायसे वाटले. काही वेळात बस परत आली व सुमनबाईंना त्यांची पिवशी सोन्याचा हार व नगदी पैशांसह सुपूर्द करण्यात आली. यावेळी बसचे चालक गोपाळ देशमुख, वाहक संदीप झाडे, वाहतूक नियंत्रक सय्यद वशीम, सुरक्षारक्षक जनार्धन खंडारे व सुमनबाई यांचे चिरंजीव प्रमोद चापके हे हजर होते. चालक-वाहकाच्या या प्रामाणिकतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# मेळघाटात टेलिमेडिसीन सुरु होणार?

### डॉ. दीपक सावंत करणार प्रयत्न

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३मेळघाट**

मेळघाटातील बंद पडलेली टेलिमेडिसीन सेवा पुन्हा सुरू होण्याचे संकेत कुपोषण निर्मूलन टास्क फोर्सचे अध्यक्ष तथा माजी आरोग्यमंत्री डॉ. दीपक सावंत यांनी दिले आहेत. टेलिमेडिसीन सेवा बंद पडल्याने गंभीर आजारांवरील उपचार तसेच गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियांसंदर्भात तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेण्यात डॉक्टरांना अडचणी निर्माण होत आहेत. राज्याचे तत्कालीन आरोग्यमंत्री असताना डॉ. दीपक सावंत यांनी टेलिमेडिसीन या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला प्राधान्य दिले होते. मेळघाटातील सेमाडोह आणि हरिसाल येथे मोठ्या गाजावाजात या सेवेचा शुभारंभ करण्यात आला होता. या माध्यमातून मुंबई, पुणे आणि नागपूर येथील तज्ज्ञ डॉक्टरांशी थेट संपर्क साधून गंभीर रुग्णांवर तत्काळ उपचार करणे शक्य होत होते. गंभीर आजार, तातडीची परिस्थिती किंवा गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियांच्या वेळी कोणते औषधोपचार करावेत, याबाबत स्थानिक डॉक्टरांना तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळत होते. त्यामुळे दुर्गम भागातील रुग्णांना मोठा दिलासा मिळाला होता. मात्र सेवा सुरू झाल्यानंतर काही महिन्यांतच टेलिमेडिसीन प्रकल्प बंद पडला. त्यामुळे आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित ही महत्त्वाची योजना



सध्या नावालाच उरली आहे. टेलिमेडिसीन सेवा बंद असल्याने मेळघाटातील डॉक्टरांना गंभीर रुग्णांवर उपचार करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. परिणामी अनेक रुग्णांना प्राथमिक उपचारानंतर थेट रेफर करण्यात येत असल्याचे चित्र आहे. दरम्यान, डॉ. दीपक सावंत यांनी पुन्हा ही सेवा सुरू करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

मागील महिन्यात मेळघाट दौऱ्यावर आलो होतो. त्यावेळी टेलिमेडिसीन सेंटर बंद असल्याची माहिती मिळाली होती. आता पुण्याला मीटिंगला जात असून आरोग्य संचालक यांना टेलिमेडिसीनची बाब निर्दर्शनास आणून दिली आणि पुन्हा टेलिमेडिसीन सुरू करण्यासाठी प्रयत्न केले जाईल. **–डॉ. दीपक सावंत** अध्यक्ष कुपोषण निर्मूलन टाक्स फोर्स तथा माजी आरोग्यमंत्री.

# फटाकेबाज बुलेटबाजांचा जुळ्या शहरात धुडगूस, रात्रीच्या सन्नाट्यात ‘धडधड’चा दहशतीचा खेळ

## पोलिसांच्या निष्क्रियतेवर नागरिक संतप्त

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अचलपूर :** जुळ्या शहरात सध्या एक वेगळीच दहशत नागरिकांच्या छातीत धडधड निर्माण करत आहे. रस्त्यावरून भरधाव वेगाने धावणाऱ्या आणि सायलेन्सरमध्ये बदल करून अक्षरशः फटाक्यांसारखे आवाज करणाऱ्या बुलेटस्वारांनी अचलपूर-परतवाडा शहरातील शांतता भंग केली आहे. रात्री-अपरात्री कानठळ्या बसवणारे आवाज करत धुडगूस घालणाऱ्या या टवाळखोर बुलेटबाजांमुळे नागरिक त्रस्त झाले असून पोलिस प्रशासन मात्र याकडे जाणीवपूर्वक कानाडोळा करत असल्याचा गंभीर आरोप नागरिकांकडून होत आहे.

अचलपूर-परतवाडा मार्ग, बस स्टॅन्ड परिसर, दुराणी चौक, जयस्तंभ चौक, चिखलदरा रोड, धारणी रोड, वाघामाता रोड ,विदर्भ मील कॉलनी स्टॉप तसेच शहरातील प्रमुख मार्गांवर रात्री उशिरापर्यंत या बुलेटबाजांचा हैदोस सुरू असतो. धडाधड फटाक्यांसारखे आवाज करत वेगाने जाणाऱ्या या दुचाकींमुळे पादचारी, महिला, लहान मुले आणि विशेषतः ज्येष्ठ नागरिक भयभीत होत आहेत. अनेक वेळा अचानक होणाऱ्या या प्रचंड आवाजामुळे लोक दचकून जातात, तर काही ठिकाणी किरकोळ अपघात टळल्याच्या घटनाही समोर येत आहेत.

एकेकाळी रुबाब आणि शिस्तीचे प्रतीक मानली जाणारी बुलेट आज काही टवाळखोरांच्या हातात दहशतीचे साधन बनत चालली आहे. सायलेन्सरमध्ये बेकायदेशीर बदल करून मुद्दाम फटाक्यांचा आवाज काढत रस्त्यावरून फिरणे, ट्रिपल सीट फिरणे, भरधाव वेगाने वाहने चालवणे आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करणे, हा या बुलेटबाजांचा नवा स्टाईल शो बनला आहे. कायद्याचा धाक संपल्याने या टवाळखोरांची मुजोरी दिवसेंदिवस वाढत असल्याचे चित्र शहरात दिसून येत आहे.

धक्कादायक बाब म्हणजे अनेकदा काही जागरूक नागरिकांनी या बुलेटबाजांना हटकण्याचा प्रयत्न केला असता उलट हे टवाळखोर अंगावर धावून येतात, शिवीगाळ करतात आणि मारहाणीच्या धमक्या देतात. त्यामुळे सामान्य नागरिक भयभीत झाले असून गुंड प्रवृत्तीच्या या बुलेटबाजांविरोधात कोणी उघडपणे बोलण्यासही धजावत नाही. पोलिसांचा धाक राहिला असता तर ही मुजोरी वाढली नसती, अशी संतप्त प्रतिक्रिया अनेक नागरिक व्यक्त करत आहेत.

वाहतूक पोलिसांनी केवळ हेल्मेट तपासणी आणि दंड वसुलीपुरते मर्यादित न राहता अशा फटाकेबाज बुलेटस्वारांवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार



मागणी शहरातून होत आहे. सायलेन्सरमध्ये बदल करून ध्वनीप्रदूषण करणाऱ्या वाहनांवर तत्काळ जप्तीची कारवाई करावी, रात्री गस्त वाढवावी तसेच प्रमुख चौकांमध्ये विशेष मोहीम राबवावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.अचलपूर- परतवाडा शहरातील वातावरण आधीच संवेदनशील असताना काही बेफाम वाहनचालकांच्या उन्मादी वर्तनामुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यापूर्वीही किरकोळ कारणांवरून शहरात तणाव निर्माण झाल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे वेळेत लगाम न घातल्यास एखाद्या दिवशी या टवाळखोर बुलेटबाजांमुळे मोठा अनुचित प्रकार घडण्याची भीती नागरिक व्यक्त करत आहेत.

रस्त्यावर स्टंटबाजी आणि फटाकेबाजी करणाऱ्यांना अभय कोणाचे? असा सवाल आता सर्वसामान्य नागरिक विचारत असून पोलिस प्रशासनाने तातडीने कठोर पावले उचलून जुळ्या शहरातील नागरिकांना या ध्वनीदहशतीतून मुक्त करावे, अशी तीव्र जनभावना व्यक्त होत आहे.